# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि – ४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित राज्य विद्यापीठ)

**(महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ)**

**(महाविद्यालयीन विभाग)**


एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५

फोन/फॅक्स नंबर ०७१३२-२१६५९४ E-Mail – arcllegesectiongug48@gmail.com

**(डॉ.एस.एम.रोकडे)**
**संचालक (प्रभारी)**


**क्र./गो.वि./महा.वि/ 4044 /२०१६**
**दिनांक 13 /०१/२०१६**

प्रति,

मा. अध्यक्ष/सचिव/प्राचार्य,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
संलग्नीत सर्व महाविद्यालये

**विषय :- महाविद्यालयातील सोई-सुविधांची माहिती महाविद्यालयाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्याबाबत.**

संदर्भ :- १. मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर यांचे पत्र क्र. एनजीसी/२०१५/सोईसुवीधा /मवि-२/१३४८९, दि. ०२/०१/२०१६ (प्राप्त दि. ०८/०१/२०१६)
२. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, म.रा.पुणे यांचे पत्र क्र. एनजीसी/२०१५/सोईसुविधा/मवि-२/१३४८९, दि. ३०.१२.२०१५

महोदय,

उपरोक्त संदर्भांकित विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयांत उपलब्ध असणाऱ्या सोई-सुविधांची माहिती (उदा. इमारत व वर्ग खोल्या, ग्रंथालय व पुस्तकांची संख्या, पिण्याचे पाणी, स्वतंत्र टॉयलेट ब्लॉक्स, क्रिडांगण, जिमन्याशियम, प्रयोगशाळा व संगणक कक्ष व त्यातील साहित्य, लेडीज रूम, वसतिगृह सुविधा, कॅन्टीन, सभागृह व व्याख्यान कक्ष, इत्यादी) आपल्या महाविद्यालयांतील संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे. सदर माहिती फक्त आहे/नाही स्वरूपात नमूद न करता संख्यात्मक स्वरूपात संकेतस्थळावर उपलब्ध करावी.

सदर कार्यवाही ही विहीत मुदतीत करावयाची असल्याने **दिनांक १५ जानेवारी २०१६** पर्यंत सर्व अधिनस्त महाविद्यालयांनी सोई-सुविधांची माहिती आपल्या महाविद्यालयांच्या संकेतस्थळावर तातडीने प्रसिध्द करण्यात यावे व त्याबाबतचा अहवाल त्वरीत विद्यापीठास पाठविण्यात यावा ही विनंती.

सहपत्र- वरिल प्रमाणे

(डॉ.एस.एम.रोकडे)
संचालक(प्रभारी)
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलीपी:-** **१. सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर यांना माहितीस्तव सविनय सादर.**
**२. मा. सिक्षण संचालक, उच्च शिक्षण, म.रा. पुणे-१ यांना माहितीस्तव सविनय सादर.**
**३. सिस्टीम ॲनालिस्ट, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली** यांना माहिती व पुढील कार्यवाहीकरिता
**४. सांख्यीकी सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली** यांना कार्यवाहीकरिता..

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
महाविद्यालयीन विभाग
आवक क्र. 6089 दिनांक 8/1/16
जावक क्र. ......... दिनांक ..........

मोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. 13 दि. 6/01/16
जावक क्र. ....... दि. 8/1/16

महाराष्ट्र शासन


सहसंचालक उच्च शिक्षण, नागपूर विभाग,
जुने मॉरिस कॉलेज इमारत, नागपूर.
Website:www.dirhe.in/jdnagpur/
Email :jdhengp@rediffmail.com
Phone No.2561713 Fax No.2554210


क्रमांक :- उशिनाग/सोयी-सुविधा/ ९३ /१५
दिनांक : — ०२/०१/२०१६

प्रति,

प्रति,
कुलसचिव,
रा. तु.महाराज नागपूर विद्यापीठ,नागपूर/गोंडवाना विद्यापीठ, गडचिराली/कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक जि.नागपूर.

**विषय- महाविद्यालयातील सोयी-सुविधांची माहिती महाविद्यालयाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्याबाबत.**
**संदर्भः-** मा.शिक्षण संचालक,उच्च शिक्षण, म. रा. पुणे यांचे पत्र
क्र. एनजीसी/२०१५/सोयीसुविधा/मवि-२/१३४८९ ,दि.३०.१२.२०१५

उपरोक्त संदर्भांकित विषयाचे अनुषंगाने मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, म. रा. पुणे यांचे सर्व विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण यांना उद्देशून लिहिलेल्या व या कार्यालयास पृष्ठांकित केलेल्या संदर्भीय पत्राचे कृपया अवलोकन करावे. सूलभ संदर्भाकरिता प्रत शासन पत्रासह सोबत आपले माहिती व कार्यवाहीस्तव संलग्न करण्यात येत आहे. **सदर पत्रात नमूद केल्याप्रमाणे आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व महाविद्यालयांना त्यांच्या महाविद्यालयात उपलब्ध असलेल्या सोयी-सुविधांची माहिती आपल्या महाविद्यालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्याबाबत सूचना देण्यात याव्यात तसेच विद्यापीठाच्या संकेतस्थळावर संबंधित महाविद्यालयातील सोयी-सुविधांची माहिती एकत्रित होईल यासाठी विद्यापीठांनी कार्यवाही करण्यात येऊन संदर्भीय पत्रात दिल्याप्रमाणे तक्त्यात माहिती मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, म. रा. पुणे यांना तात्काळ पाठविण्यात येऊन त्याची प्रत या कार्यालयास देण्यात यावी ही विनंती.**

**सहपत्र** - वरील प्रमाणे

Colly Sel. 8/1/16

A.M. Rahatgaonkar
(डॉ.अंजली रहाटगांवकर)
सहसंचालक उच्च शिक्षण,
नागपूर विभाग,नागपूर.

प्रत — १. सर्व प्राचार्य, अशासकीय अनुदानित महाविद्यालये, नागपूर विभाग, नागपूर यांना माहिती व कार्यवाहीस्तव अग्रेषित. आपणांस कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयाची उपलब्ध सोयी-सुविधांची माहिती महाविद्यालयाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात येऊन त्याबाबतचा अहवाल विद्यापीठास व या कार्यालयास पाठविण्यात यावा.
२.. मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, म. रा. पुणे-१ यांना संदर्भीय पत्राचे अनुषंगाने माहितीस्तव सविनय सादर.

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१
Email: mavi.dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२२१११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६१११११५३

क्र.एनजीसी/२०१५/सोईसुविधा/मवि-२ /13589. दि. /१२/२०१५
30 DEC 2015

प्रति,
सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण.

आवक क्र. 28
दि. 9.1.16

विषयः- महाविद्यालयातील सोई-सुविधांची माहीती महाविद्यालयाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणेबाबत.

उपरोक्त विषयांकित प्रकरणी राज्याची प्रगती होण्यासाठी तसेच स्पर्धेमध्ये टिकून राहण्यासाठी नागरीकास दर्जेदार शिक्षण मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे उच्च शिक्षणाचा दर्जा उंचावणे व त्याची गुणवत्ता वाढविणे अत्यावश्यक आहे.

गुणवत्ता वाढीसाठी महाविद्यालयातील सोई-सुविधा हा एक महत्वाचा घटक आहे. सदर सोई-सुविधांची माहीती विद्यार्थी पालकांना होणे आवश्यक आहे.

सबब आपल्या अधिनस्त सर्व महाविद्यालयांना महाविद्यालयात उपलब्ध असणाऱ्या सोई-सुविधांची माहीती ( उदा. इमारत व वर्ग खोल्या, ग्रंथालय व पुस्तकांची संख्या, पिण्याचे पाणी, स्वतंत्र टॉयलेट ब्लॉक्स, क्रिडांगण, जिमन्याशियम, प्रयोगशाळा व संगणक कक्ष व त्यातील साहित्य, लेडीज रुम, वसतिगृह सुविधा, कॅन्टीन, सभागृह व व्याख्यान कक्ष, इत्यादी ) महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याबाबत कळविण्यात यावे. सदर माहिती फक्त आहे/नाही या स्वरुपात नमूद न करता संख्यात्मक स्वरुपात संकेतस्थळावर उपलब्ध करावी.

महाविद्यालयनिहाय यादी व त्या महाविद्यालयाच्या संकितस्थळाचे नांव आपल्यास्तरावर घेऊन अशी माहिती प्रसिध्द केल्याबाबत महाविद्यालयाकडून प्रमाणपत्र घेण्यात यावे, व खालील नमुन्यात अहवाल संचालनालयास सादर करण्यात यावा. तसेच विद्यापीठांनाही पत्र देऊन याबाबत सर्व महाविद्यालयांच्या सोई-सुविधांची माहीती संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याबाबत महाविद्यालयांना कळविण्याच्या सुचना देण्यात याव्यात, तसेच विद्यापीठाच्या संकेतस्थळावर संबंधीत महाविद्यालयातील सोई-सुविधांची माहीती एकत्रित उपलब्ध होईल यासाठी विद्यापीठांनी कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात यावे.

| अ.क्र | महाविद्यालयांची संख्या | सोईसुविधांची माहिती संकेतस्थळावर उपलब्ध केलेल्या महाविद्यालयांची संख्या | महाविद्यालयांची माहिती विद्यापीठांच्या संकेतस्थळावर उपलब्ध केली आहे काय. | शेरा. |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |

सदर कार्यवाही ही विहीत मुदतीत करावयाची असल्याने आपल्या अधिनस्त महाविद्यालये व विद्यापीठांना सुचना देऊन १५ जानेवारी २०१६ पर्यंत सर्व महाविद्यालयांच्या सोई-सुविधांची माहिती संकेतस्थळावर उपलब्ध होण्याच्या दृष्टीकोनातून आपले स्तरावरुन पाठपुरावा करण्यात यावा.

( डॉ.धनराज माने )
शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रतः- कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे यांना माहिती व कार्यवाहीस्तव.

1.1.2016